# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना व प्रशासन विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

email :- gug.registrar@gmail.com दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४ email:- establishment.section@unigug.ac.in

जा.क्र. गो.वि./आस्था./२४९२/२०२६ दि. २८/०७/२०२६

## परिपत्रक

**विषय: गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यातील अतिवृष्टीच्या इशाऱ्याच्या ("रेड अलर्ट") पार्श्वभूमीवर दिनांक २९ जुलै २०२६ रोजी सर्व संलग्नित महाविद्यालयांना / शैक्षणिक विभागांना सुट्टी जाहीर करण्याबाबत.**

संदर्भ: 1. मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली यांचे पत्र क्र. ११४८, दिनांक २८/०७/२०२६.

2. मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपूर यांचे पत्र क्र. २०२६/१५७५, दिनांक २८/०७/२०२६.

सर्व संबंधितांना सूचित करण्यात येते की, प्रादेशिक हवामान केंद्र, भारतीय हवामान खाते, नागपूर यांनी वर्तविलेल्या अंदाजानुसार दिनांक २९ जुलै २०२६ रोजी **गडचिरोली व चंद्रपूर** जिल्ह्यात अत्यंत मुसळधार पावसाची शक्यता वर्तवून "रेड अलर्ट" (Red Alert) जारी केला आहे.

या अनुषंगाने, गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे उद्भवू शकणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीचा परिणाम विद्यार्थ्यांवर होऊ नये व कोणतीही अनुचित घटना घडू नये याकरिता, गडचिरोली आणि चंद्रपूर या दोन्ही जिल्ह्यांचे मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांनी आपल्या अधिकारांतर्गत सदर दोन्ही जिल्ह्यांतील सर्व शैक्षणिक संस्थांना संदर्भिय आदेशान्वये दिनांक २९/०७/२०२६ रोजी सुट्टी जाहीर केली आहे.

**त्याअनुषंगाने दिनांक २९/०७/२०२६ (बुधवार) रोजी गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यातील गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये / शैक्षणिक विभाग बंद राहतील. याची नोंद घ्यावी.**

तसेच गोंडवाना विद्यापीठाशी सर्व संलग्नित महाविद्यालयांच्या प्राचार्यांना / शैक्षणिक विभागांच्या प्रमुखांना याद्वारे सूचित करण्यात येते की, त्यांनी मा. जिल्हाधिकाऱ्यांच्या संदर्भिय आदेशाचे अवलोकन करुन तात्काळ अंमलबजावणी करावी. व अतिवृष्टीच्या काळात विद्यार्थी व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक त्या सर्व खबरदारीच्या उपाययोजना कराव्यात.

**(डॉ. अनिल हिरेखण)**
कुलसचिव,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रत माहिती व योग्य कार्यवाहीसाठी सादर:**

१. मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
2. मा. प्र-कुलगुरू महोदयांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
3. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहिती तथा कार्यवाहीकरीता अग्रेषित.
4. सर्व शैक्षणिक विभागांचे मा. विभाग प्रमुख / समन्वयक/कार्यालय प्रमुख, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहिती तथा कार्यवाहीकरीता अग्रेषित.
5. सिस्टीम ॲनालिस्ट, संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना सुचित करण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.
6. सहा. कुलसचिव / उपकुलसचिव, महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांनी सदर परिपत्रक सर्व संलग्नित महाविद्यालयांना अवगत करुन द्यावे.

महाराष्ट्र शासन
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली**
**तळमजला, जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली-४४२६०५**
▸ टोल-फ्री क्र. : १०७७ ▸ दूरध्वनी क्र. : ०७१३२-२२२०३१/३५,
मो.क्र. ९४२३९११०७७ ▸ E-mail id : dmcellgadchiroli@gmail.com

**जि.का./क्र.कार्या-३/अका.आव्यक/कावि-1148/२०२६** **दिनांक : 28 जुलै, २०२६**

**संदर्भ :**

1) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005
2) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे कडील शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-2019. प्र.क्र. 199/एसडी-2/ दिनांक 02/08/2019
3) भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक केन्द्र नागपूर यांचे ई-मेल वरील सुचना दिनांक 28.07.2026

## आदेश

**(शाळा/विद्यालये बंद ठेवणेबाबत)**

**ज्याअर्थी,** उक्त नमूद अ.क्र.2 अन्वये भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक केंद्र, नागपूर यांचे पूर्व सुचनेवरून जिल्ह्यातील त्या-त्या भागातील स्थानिक परिस्थितीचा आढावा घेवून, संपूर्ण जिल्ह्याकरिता अथवा जिल्ह्यातील ठराविक स्थानिक क्षेत्रातील शाळांना सुट्टी जाहीर करण्याचे अधिकार संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत. तसेच आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 मधील कलम 25 अन्वये जिल्हाधिकारी हे आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष आहेत व संदर्भ क्र.2 कडील शासन परिपत्रकानुसार शाळांना सुट्टी जाहीर करण्याचे अधिकार संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेले आहेत.

**ज्याअर्थी,** सध्या मान्सून कालावधी सुरु असून आज दिनांक 28.07.2026 रोजी हवामान विभाग, नागपूर प्रादेशिक केन्द्र यांचे ईमेल वरील प्राप्त सुचनेनुसार गडचिरोली जिल्हयाला दिनांक 28.07.2026 रोजी ऑरेन्ज अलर्ट, **दिनांक 29.07.2026 रोजी रेड अलर्ट दिलेला** असुन दिनांक 30.07.2026 रोजी ऑरेन्ज अलर्ट दिलेला आहे. सदर हवामान अंदाजानुसार गडचिरोली जिल्ह्यात मुसळधार ते अतिमुसळधार पाऊसाची शक्यता वर्तविण्यात आलेली असुन वैनगंगा, गोदावरी, प्राणहिता, बांडिया, इंद्रावती इ. नद्यांच्या पाण्याची पातळीत वाढ होण्याची शक्यता लक्षात घेता तसेच सदर पाणलोट क्षेत्रातील नद्या व नाल्यांना पूर येण्याची शक्यता लक्षात घेता जिल्ह्यातील शाळांना सुट्टी देणे आवश्यक असल्याची माझी खात्री झालेली आहे.

**त्याअर्थी,** मी अविश्यांत पंडा, जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली उक्त संदर्भ क्र. 01 ते 02 नुसार प्राप्त अधिकारांचा वापर करून गडचिरोली जिल्ह्यातील पूरपरिस्थितीवर उचित प्रतिबंधात्मक उपाययोजनेतंर्गत गडचिरोली जिल्ह्यातील सर्व अंगणवाडी, सर्व सरकारी व खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळा, जिल्हा परिषद शाळा, नगरपालिका शाळा, अनुदानित व विना अनुदानित शाळा, सर्व आश्रमशाळा, सर्व महाविद्यालये व आयुक्त व्यवसाय व प्रशिक्षण केंद्र, यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था, औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांना **विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून संपूर्ण गडचिरोली जिल्हा सीमाक्षेत्रामध्ये दिनांक 29 जुलै, 2026 , बुधवार रोजी सुट्टी जाहीर करीत आहे.**

**(कृ.मा.प)**

सदरील आदेशाचे पालन न करणारी उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती, संस्था अथवा समूह यांनी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ तसेच भारतीय दंड संहिता १८६० तसेच प्रचलित नियम/धोरण/कायदेनुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल व नियमानुसार कारवाई करण्यात येईल,

सदरचे आदेश आज दिनांक 28/07/2026 रोजी माझे सही व शिक्क्यानिशी निर्गमित करण्यात येत आहे.

(अविश्यांत पंडा, भा.प्र.से)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली**

**प्रत: माहितीस सविनय सादर**

१. मा. प्रधान सचिव आपत्ती व्यवस्थापन वन विभाग, मंत्रालय, मंबई
२. मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर
३. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई

**माहितीस तथा उचित कार्यवाहीस अग्रेषित**

४. पोलीस अधिक्षक तथा सदस्य जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली
५. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. तथा सदस्य जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली
६. **प्रकल्प अधिकारी, आयटीडीपी गडचिरोली/भामरागड/एटापल्ली**
७. **कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**
८. उपविभागीय अधिकारी (महसूल) गडचिरोली/चामोर्शी/अहेरी/एटापल्ली/देसाईगंज/कुरखेडा
९. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (आयसीडीएस), जि.प. गडचिरोली
१०. कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग तथा सदस्य जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली
११. **सहा. आयुक्त जिल्हा समाजकल्याण, गडचिरोली**
१२. **प्राचार्य औ.प्र.संस्था, गडचिरोली**
१३. **जिल्हा माहिती अधिकारी, गडचिरोली यांना निर्देशित करण्यात येते की, व्यापक प्रमाणात प्रसिद्धी देण्यात यावे.**
१४. तहसिलदार तथा अध्यक्ष, तालुका आपत्ती व्यवस्थापन समिती गडचिरोली/धानोरा/चामोर्शी/मुलचेरा/अहेरी/सिरोंचा/एटापल्ली/भामरागड/आरमोरी/देसाईगंज/कुरखेडा/कोरची
१५. **शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जि.प. गडचिरोली यांना निर्देशित करण्यात येते की तातडीने सर्व संबंधितांना कळविण्यात यावे.**
१६. आगार व्यवस्थापक एमएसआरटीसी, गडचिरोली
१७. मुख्याधिकारी, (सर्व) नगरपरिषद/नगर पंचायत, जि. गडचिरोली
१८. सर्व संबंधित विभाग/अधिकारी (जिल्हा गडचिरोली)

(अविश्यांत पंडा, भा.प्र.से)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली**

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

महसूल विभाग

# जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचे कार्यालय

E-mail :- chandrapur.rdc@gmail.com फोन - 07172 – 250077

**पत्र क्रं. कावि/समअ/नै.आ./टे-1/2026/**1575 दिनांक: 28/07/2026

**वाचले :-** 1. **प्रादेशिक हवामान केंद्र, भारतीय हवामान खाते, नागपूर यांचा दिनांक** 28/07/2026 **चा हवामान ईशारा.**
2. **आपत्ती व्यवस्थापन अधिनियम,** 2005

**आदेश : -**

**ज्याअर्थी** भारतीय हवामान खात्याच्या वर्तवलेल्या अंदाजानुसार दिनांक 29/07 /2026 रोजी चंद्रपूर जिल्ह्यात **"रेड अलर्ट"** दिलेला असुन काही ठीकाणी अत्यंत मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तविलेली आहे.

**आणि ज्याअर्थी** चंद्रपूर जिल्हयात कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये तसेच अतिवृष्टीमुळे आपतकालीन परिस्थिती निर्माण झाल्यास त्याचा परिणाम शालेय विद्यार्थ्यावर होऊ नये या करिता चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व अंगणवाड्या, पुर्व प्राथमिक,प्राथमिक व माध्यमिक शाळा, विद्यालये, महाविद्यालये व खाजगी कोचिंग क्लासेस यांना दिनांक 29/07/2026 रोजी सुट्टी असणे आवश्यक आहे अशी माझी खात्री झाली आहे.

**त्याअर्थी,** मी वसुमना पंत , जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपूर, मला आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 मधील कलम 30 (2)(5) व (18) नुसार प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन, **चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व अंगणवाड्या, पुर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक शाळा, विद्यालये, महाविद्यालये व खाजगी कोचिंग क्लासेस यांना दिनांक 29/07/2026 रोजी सुट्टी जाहिर करीत आहे.** उक्त आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करावी.

तरी नागरीकांनी भारतीय हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार सतर्क राहून आवश्यक खबरदारी घ्यावी व आपतकालीन परिस्थितीत खालील दिलेल्या ठिकाणी संपर्क साधावा. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर संपर्क क्र. 07172 250077

Vasumana.

**(वसुमना पंत)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**चंद्रपूर**

जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी कार्यालय ★ चंद्रपूर ★

प्रतिलिपी : 1. मा. विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर विभाग, नागपूर यांस माहितीस्तव सादर.

2. संचालक, आपत्ती व्यवस्थापन केंद्र मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव.
3. पोलिस अधिक्षक, चंद्रपूर
4. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांनी आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व महाविद्यालयांना सुचित करण्यात यावे.
5. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद चंद्रपूर यांना माहिती व उचित कार्यवाही करीता.
6. शिक्षणाधिकारी, प्राथमिक/माध्यमिक जिल्हा परिषद चंद्रपूर यांना सुचित करण्यात येते की आपल्या अधिनस्त सर्व शाळांना सुचना देण्यात यावी.
7. शिक्षणाधिकारी, महानगरपालिका, चंद्रपूर यांना सुचित करण्यात येते की आपल्या अधिनस्त सर्व शाळांना सुचना देण्यात यावी.
8. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी जि.प.चंद्रपूर
9. संचालक आकाशवाणी केंद्र चंद्रपूर यांनी आपल्या स्तरावरून प्रसिध्दी द्यावी.
10. जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपूर यांना उचित कार्यवाही करिता अग्रेषित.

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**चंद्रपूर**